**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**

**३० वा दीक्षांत समारंभ**

**मंगळवार, दिनांक ४ मार्च, २०१४**

**श्री. सुधीर ठाकरे**

**मा.अध्यक्ष, महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांचे**

**दीक्षांत भाषण**

सर्व प्रथम मला या पदवीदान समारंभाचे प्रमुख अतिथीपद भुषविण्याचा मान दिल्याबद्दल मी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे शतशः आभार मानतो. कारण मी माझ्या बी.एस्सी. व एम.एस्सी. (पदार्थविज्ञान) या स्नातक व स्नातकोत्तर पदव्या अनुक्रमे 1974 व 1976 साली नागपुर विद्यापीठातून घेतल्या आहेत. त्यावेळी संपूर्ण विदर्भाकरीता नागपुर हे एकमेव विद्यापीठ होते आणि त्याची विभागणी नंतर संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपुर विद्यापीठ अशी झाली. ज्या विद्यापीठातुन मी पदव्या प्राप्त केल्या त्याच विद्यापीठाच्या क्षेत्रातील पदवीदान समारंभाचे प्रमुख अतिथी पद भुषविण्याचे भाग्य प्राप्त झाले हा मी मोठा सन्मान मानतो.

या विद्यापीठाचे संत गाडगेबाबा हे नामाभिधान सर्वार्थाने सार्थ आहे, कारण संत गाडगेबाबा यांनी त्यांचे आयुष्य समाजाच्या उपेक्षित घटकांमध्ये शैक्षणिक मुल्यांचा प्रचार आणि प्रसार करण्यात विशेषत्वाने वेचले. शिक्षणाचा मूळ उद्देशच प्रत्येकाची मनशुद्धी, देहशुद्धी आणि आत्मशुद्धी करुन समाजात जागृती व सजगता निर्माण करणे हा आहे. संत गाडगेबाबा यांनी त्यांच्या कार्यातून केवळ शारिरिक आणि पर्यावरणीय स्वच्छतेचेच शिक्षण दिले नाही तर समाजाची बौध्दिक, भावनिक आणि आध्यात्मिक श्रीमंती वाढविण्याकरीता देखील मोलाचे योगदान केले आहे. आपल्या अनेक सामाजिक, राजकीय, विचारवंतानी आणि नेत्यांनी स्वच्छतेचे धडे मूल्य शिक्षणाबरोबर कसे जोडले याची जाण मी नमूद करीत असलेल्या काही वाक्यातून सहज स्पष्ट होते.

"आपल्या सर्वांना जेवढे कष्ट स्वातंत्र्य प्राप्तीकरिता लागले नाही त्यापेक्षा किती तरी जास्त प्रयत्न देश स्वच्छ करण्यासाठी आणि लोकशिक्षणासाठी करावे लागणार आहेत" —महात्मा गांधी.

" भारतीय स्वातंत्र्याच्या पूर्णत्वाचे मूल्यमापन माझ्या मते ज्या दिवशी देशात कोणत्याही महिलेला उघडयावर शौचास जावे लागणार नाही आणि ज्या दिवशी प्रत्येक माता आपल्या बालकाला स्वत: शिकवु शकेल त्या दिवशीच होईल" — पंडीत जवाहरलाल नेहरु.

"शिका, संघटीत व्हा, संघर्ष करा" — डॉ. बाबासाहेब आंबेडकर

संत गाडगेबाबा यांनी सुध्दा त्यांच्या आगळयावेगळया शैलीतून शिक्षणाचा हाच संदेश, हेच तत्वज्ञान तळागाळातल्या माणसांपर्यंत पोहोचविले आणि रुजविले. त्यामुळे "संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ" या पेक्षा दुसरे कोणतेही सुयोग्य नाव या विद्यापीठाला असूच शकले नसते असे मला वाटते. या प्रसंगी या महान् विभूतीला माझे शतश: प्रणाम ।

शिक्षणातून ज्ञान, कौशल्य आणि मुल्ये रुजवून प्रत्येकाने आपले वैयक्तिक, सामाजिक आणि अध्यात्मिक आयुष्य चांगल्या प्रकारे जगावे हेच कोणत्याही शिक्षण प्रणालीचे मर्म आहे. शिक्षणतज्ञ याला "Development of 3H — Head, Heart and Hand" असेही संबोधितात. शिक्षण हे प्रत्येक व्यक्तीमध्ये सुयोग्य बौद्धिक, भावनिक व स्वनूभूती विकसीत करण्याचेही माध्यम आहे. प्रत्येकाच्या जीवनात शिक्षण इतके महत्वाचे आहे की देशाच्या सर्वोच्च न्यायालयानेही जेव्हा "जगण्याचा अधिकार" या मुलभूत हक्काची व्याप्ती "प्रतिष्ठेने जगण्याचा अधिकार" अशी विश्लेषीत केली त्यातही शिक्षण हा प्रतिष्ठेने जगण्यासाठी अतिशय महत्वाचा घटक असे नमूद केले आहे.

त्यामुळे साहजिकच कोणत्याही विद्यापीठाचे मुल्यमापन हे केवळ विद्यापीठातून किती विद्यार्थी उत्तीर्ण झाले, विद्यापीठात किती प्रकारचे विभाग आहेत, किती डॉक्टरेट्स विद्यापीठाने प्रदान केल्यात यावरुन केवळ होणार नाही तर सर्वार्थाने किती ज्ञान, कौशल्य आणि मूल्ये विद्यार्थ्यामध्ये रुजविली आहेत की ज्यामुळे विद्यार्थी एक जबाबदार व्यक्ती, वत्सल, कुटूंबप्रमुख आणि सन्माननीय नागरीक म्हणून जगू शकतो यावरुनच करता येईल. विद्यापीठातील विद्यार्थ्यांची केवळ संख्यात्मक वाढ नव्हे तर त्याच्यातील गुणात्मक श्रेष्ठता हा कुठल्याही विद्यापीठाचा गुणवत्तामापनाचा निकष असला पाहिजे. मला खात्री आहे की, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ 1 मे, 1983 पासून, म्हणजे त्याच्या स्थापनेपासून त्यांचेशी संलग्न असलेल्या 413 महाविद्यालये, 23 स्नातकोत्तर विभाग, 3 लाख विद्यार्थी नोंदणी आणि 5200 शिक्षकाद्वारे या उद्दिष्टांकडे प्रभावीपणे मार्गक्रमण करीत आहेत.

सध्याचे युग हे स्पर्धेचे युग आहे. जीवनाच्या सर्वच क्षेत्रात स्पर्धा आहे. मग ती वैयक्तिक असो, विद्यार्थ्यामधील असो किंवा राज्य, देश अथवा इतर आर्थिक, सामाजिक अथवा राजकीय क्षेत्रातील असो. आपल्या राज्यघटनेतील "न्यायापुढे सर्व समान आणि सर्वांना कायद्याचे समान संरक्षण" या मुलभूत तत्वाद्वारे आणि त्याला शिक्षणाचा मूलभूत अधिकार याची जोड मिळाल्याने प्रत्येक व्यक्तीला ती कोणत्याही भागातील रहिवासी असली अथवा कोणत्याही धर्माची, जातीची, वर्गाची असली तरी स्वयम् विकासाला पूर्ण वाव आहे. विद्यापीठ त्याचे मूर्त उदाहरण आहे.

शिक्षणाचे आणखी एक महत्वाचे कार्य विद्यार्थ्यामध्ये "विचार करण्याचे कौशल्य" निर्माण करणे हे आहे. परंतु आपल्या शैक्षणिक पद्धतीत, अगदी प्राथमिक शिक्षणापासुन तर स्नातकोत्तर अथवा त्यानंतरच्या स्तरापर्यंतही आपल्या विद्यार्थ्यांना आपण "विचार कसा करु नये" हेच जास्त शिकवितो असा आरोप होतो. विद्यार्थ्यांचे मुलभूत संशोधनाकडे होणारे

दुर्लक्ष हे त्याचेच द्योतक आहे. शोधण्याची प्रज्ञा निर्माण करणे, विश्लेषणात्मक पद्धतीने ज्ञानार्जन करणे या काही महत्वाच्या बाबी आपल्या शिक्षण पद्धतीत प्रकर्षाने दिसून येत नाहीत. या बाबत आपल्या सर्वांना गंभीर आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. आपल्या भारतीय राज्य घटनेत सुद्धा नागरिकांच्या मुलभूत कर्तव्यामध्ये नमूद आहे, की प्रत्येक नागरिकाने वैज्ञानिक दृष्टिकोन, मानवतावाद, शोधन संहिता विकसित करणे आणि प्रत्येक व्यक्तीने त्याचे वैयक्तिक आणि सार्वजनिक कृतीमध्ये सर्वोत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी प्रयत्न करणे, जेणेकरुन आपले राष्ट्र सातत्याने जगात सर्वोच्च स्थानावर पोहोचेल हे प्रत्येकाचे मूलभूत कर्तव्य आहे. परंतु या दृष्टीने प्रत्यक्ष कृती होतांना दिसत नाही. माझ्या या म्हणण्यामागे गेल्या दोन वर्षात महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचा अध्यक्ष म्हणून मला जो अनुभव आला तो कारणीभूत आहे. जेव्हा राज्यातील पाटबंधारे, सार्वजनिक बांधकाम व पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या अभियंत्याच्या भरतीसाठी घेतलेल्या स्पर्धा परीक्षेत हजारो अभियंते परीक्षेला बसले असतांना आणि अभियांत्रिकी विषयाचीच विशेष परीक्षा असूनही मुलाखतीस पात्र होण्यासाठी लेखी परीक्षेत 30 ते 35 टक्के किमान गुण मिळवणारे पुरेसे उमेदवार उपलब्ध होत नाही तेव्हा निश्चितच मला काळजी वाटते. जेव्हा हजारो कायदा स्नातक न्यायाधीशांच्या परीक्षेला बसतात परंतु एकूण भरावयाच्या पदांच्या तीन पट उमेदवारही 40 टक्क्या पेक्षा जास्त गुण मिळवुन मुलाखतीस पात्र होत नाहीत तेव्हा निश्चितच राज्यातील शिक्षण व्यवस्थेबाबत बद्दल माझे मनात भिती निर्माण होते. याबाबीकडे निश्चीतच आपण सर्वांनी गंभीरपणे पहाण्याची गरज आहे आणि यावर चर्चा, विवेचन करुन, काय चुकते आहे आणि या चुका कशा दुरुस्त करता येतील याबाबत निर्णय घेणे आंम्हा सर्वांचे परमकर्तव्य आहे असे मला वाटते. महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे 118 विविध प्रकारच्या प्रशासकीय, व्यावसायिक, तांत्रिक आणि व्यवस्थापकीय पदांकरीता

राज्यातील विविध विद्यापीठातुन दरवर्षी सरासरी 15 लाख पदवी पाप्त उमेदवार परीक्षेला बसतात आणि त्यातून दरवर्षी भरल्या जाणा-या सरासरी 5000 पदांचा विचार करता एका पदाकरीता 300 विद्यार्थी हे परीक्षेला बसण्याचे प्रमाण असुनही जेव्हा त्यामधुन 1 पदाकरीता 3 विद्यार्थी सुध्दा किमान अर्हता गाठून मुलाखतीपर्यंत पोहोचु शकत नाही तेव्हा निश्चितच या परिस्थितीचा गांभीर्याने विचार करण्याची आवश्यकता वाटते. शिक्षणाच्या एकूणच दर्जाबाबत आत्मचिंतन, आत्मपरीक्षण व फेरतपासणी करणे गरजेचे होवून बसते.

आपल्या देशाला, राज्याला "लोकसंख्येचा फायदा" (Demographic Dividend) हे राष्ट्र निर्मितीसाठी, शिघ्र विकासासाठी, एकात्मिक प्रगतीसाठी एक महत्वाचे व अमूल्य साधन आहे असे आपण मानतो व ते योग्यच आहे. आमचा हा तरुण वर्ग, विशेषत: सध्या विद्यापीठात शिक्षण घेत असलेला आणि नुकताच विद्यापीठातून बाहेर पडलेला 18 ते 29 वयोगटातील तरुण वर्ग हा अतिशय महत्वाचा ठेवा असला तरी जर तो योग्य पद्धतीने हाताळला गेला नाही तर त्यांचे दूरगामी परीणाम होवू शकतात. ही लोकसंख्या फायद्याची न ठरता तिचे रुपांतर सामाजिक संघर्ष, आर्थिक भुर्दंड आणि राजकीय आपत्ती यामध्ये होवू शकते. हे रोखण्यासाठी विद्यापीठातील शिक्षण हे व्यवसाय विकासाचे (Career Building) विश्वसनीय साधन आहे असे जोपर्यंत आपण बिंबवू शकत नाही तोपर्यंत मार्ग कठीणच आहे. एका राष्ट्रीय स्तरावरील सर्वेक्षणात निदर्शनास असे आले आहे की विद्यापीठातून पदवी प्राप्त करणारे 40 टक्केपेक्षा जास्त तंत्रज्ञ व तज्ञ स्नातक हे नोक-या देण्याजोगे (unemployable) नाहीत किंवा बाजाराला आवश्यक असणारी कौशल्ये त्यांच्याकडे नाहीत. ही टक्केवारी अतांत्रिक क्षेत्रातील पदव्यामध्ये आणखी जास्त प्रमाणात आहे. दर महिन्याला आपल्या देशात काम करण्याच्या तरुणांच्या संख्येत 10 लाखाची भर पडत आहे यापैकी मोठया प्रमाणावर विद्यापीठातून या तरुण वर्गाची निर्मिती होत आहे. ही परिस्थिती

जर त्वरित आणि प्रभावीपणे हाताळली नाही तर हा लोकसंख्येचा फायदा वरदान ठरण्याऐवजी शाप ठरेल. विद्यापीठांनी ही परिस्थीती बदलण्याकरीता त्वरित पावले उचलणे आवश्यक आहे.

मी तुमच्या निदर्शनास आणखी एक महत्वाचा मुद्दा आणू इच्छितो ते म्हणजे राज्याच्या नागरी सेवांमध्ये निर्दशनास आलेला क्षेत्रीय असमतोल. गेल्या काही वर्षाची आकडेवारी असे स्पष्टपणे दाखविते की अमरावती विद्यापीठाच्या क्षेत्रातून राज्याच्या नागरी सेवेत नियुक्त झालेले विद्यार्थ्यांची टक्केवारी केवळ 5 टक्के आहे. नागपुर विद्यापीठाच्या क्षेत्राची परिस्थिती यापेक्षा वाईट म्हणजे केवळ 3 टक्के आहे. त्याचवेळी पुणे विभागातील पाच जिल्हयातील निवडीची हीच टक्केवारी 55 ते 60 टक्के आहे. म्हणजे विदर्भातील प्रादेशिक असमतोल हा केवळ भौतिक मुलभूत सुविधा आणि सामाजिक व इतर परंपरागत विकासक्षेत्रामध्येच केवळ नाही तर नागरी सेवेतील निवडीत सुध्दा आहे. यामुळे या परिसरातील महत्वाची तांत्रिक, प्रशासकीय, व्यावसायिक पदे, ज्याचा थेट संबंध आरोग्य, शिक्षण, अभियांत्रिकी, पोषण अशा महत्वाच्या मूलभूत सेवांशी येतो ती वर्षानुवर्षे रिक्त रहात आहेत. याचा अर्थ या विभागातील विद्यार्थ्यांमध्ये चांगले अभियंते, प्रशासक, शिक्षणतज्ञ होण्याची क्षमता नाही असे मुळीच नाही, तर त्याकरीता लागणा-या ज्या सुविधा, गरजा व वातावरण आवश्यक आहे, विशेषत: या स्पर्धेच्या युगात टिकण्याकरीता ज्याची गरज आहे त्या पुरेशा उपलब्ध नाहीत. मला वाटते संत गाडगेबाबा विद्यापीठासारख्या संस्थांनी यासाठी महत्वाची जबाबदारी उचलणे गरजेचे आहे. ही बाब मी मा. राज्यपालांच्या निदर्शनासही आणुन दिलेली आहे, कारण ते राज्यातील विद्यापीठांचे कुलपती आहेत. परंतु या प्रसंगी मी ही परिस्थिती आपल्यासमोर सुध्दा सादर करु इच्छितो कारण या ठिकाणी विद्यार्थी, शिक्षक आणि या भागातील सामाजिक व राजकीय क्षेत्रातील नेते, ज्यांना या भागाच्या विकासाबद्दल

आत्मियता व काळजी आहे, ते उपस्थित आहे. त्यांचे निदर्शनास मी हे जाणीवपूर्वक आणून देत आहे. मला वाटते या बाबीवर चर्चा व्हावी आणि ही स्थिती सुधारण्याकरीता, यातुन काहीतरी मार्ग काढण्याचा प्रयत्न व्हावा अशी माझी विनंती आहे.

माझ्या प्रिय विद्यार्थ्यांनो, आज, ज्या दिवशी आपणाला या विद्यापीठातुन पदवी मिळत आहे आणि तुम्ही आयुष्याच्या एका वळणावरुन भरपुर संधी प्राप्त होणा-या दुस-या एका जगात पदार्पण करीत आहात. परंतु आपणास जशा संधी प्राप्त होणार आहेत तशी आव्हाने सुद्धा येणार आहे. माझी खात्री आहे की या विद्यापीठाने आपणाला ही आव्हाने पेलण्यासाठी आणि मिळालेल्या संधीचा पुरेपूर लाभ घेण्यासाठी निश्चितपणे व सशक्तपणे तयार केले असेल. त्यामुळे आपण समर्थपणे या संधींचा लाभ घ्याल व ही आव्हाने पेलाल यात शंका नाही. मी तुम्हा सर्वांचे आपण प्राप्त केलेल्या या यशासाठी अभिनंदन करतो आणि विशेषत: ज्यांनी विशेष प्राविण्यासह, गुणवत्ता प्राप्त केली आहे त्याचे विशेष अभिनंदन करतो. मी आशा करतो की या विद्यापीठाचे प्राधिकारीणी माझ्या सूचनांचा योग्य तो विचार करतील आणि संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ देशातील नव्हे तर जगातील महत्वाचे शैक्षणिक व्यासपीठ बनेल.

*********